!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शांतता भंग करणाऱ्यांना शिवसेना सोडणार नाही - खासदार चंद्रकांत खैरे

## व्यापारी व नागरिकांना, कार्यकर्त्यांना ही सतर्क राहण्याचे आवाहन खासदार चंद्रकांत खैरे यांचे आवाहन

**संभाजीनगर : (ता.१८)** शनिवारी मध्यरात्री १२ वाजता टिळकपथ पैठणगेट भागात धर्मांध मुस्लीमांनी हिंदू व्यापारी मधुकर गाडेकर व कुंटूबीय यांना प्रचंड मारहाण करत दुकानातील माल लुटला तसेच जातीवाचक शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी देत परिसरातील शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला. या दहशतीला घाबरुन गाडेकर कुंटूबियांनी आज शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची भेट घेऊन संबंधितावर कडक कारवाई करण्याची मागणी केली.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी त्वरीत संपर्क साधुन गाडेकर यांच्या कुंटूबियांवर झालल्या हल्याची चौकशी करुन समाजकंटकांना कडक शिक्षा करण्याची मागणी केली. यावेळी गाडेकर यांच्या पत्नी हिराबाई, मुलगा करण, रामदास, अर्जुन यांची अस्थावाईकपणे चौकशी करुन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी धिर दिला.

यावेळी पोलीस आयुक्तांनी आपण नागरिकांना शांतता ठेवण्याचे आवाहन केले आहे, परंतु या उलट जर काही समाज कंटकांनी शांतता भंग केल्यास त्यांना आपण कदापी माफ करणार नसल्याचे सांगितले. तसेच या प्रकरणी आपण स्वत: ही लक्ष घालून व्यापाऱ्यांना व नागरिकांना, कार्यकर्त्यांना ही सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

यावेळी उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, माजी नगरसेवक गोपाल कुलकर्णी, गुलमंडी शाखाप्रमुख सचिन खैरे, पंकज जगताप, नारायण कानकाटे आदिंची उपस्थिती होती.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400